॥ गीत राहीले ओठातल्या ओठात ॥

गायकः वसंतराव देशपांडे
गीतः वा. रा. कांत
संगीतः श्रीनिवास खळे

राहीले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे
भेट होती आपुली ती खरी की स्वप्न माझे ? ॥ धृ. ॥

कांपरे ते हात हाती बावरे डोळ्यात आसू
आग पाण्यातून पेटे जाळणारे गोड हांसू ।
दोन थेंबाच्या क्षणांचे प्रीतिचे तकदीर माझे ॥ १ ॥

गर्द हीरवे पांच पाणी रक्तकमळे कुंकुमाची
खेळताना बिंबलेली शुभ्र जोडी सारसांची ।
आठवे म्हंटलेस ना तू हे हवेसे विश्व माझे ॥ २ ॥

मी म्हणू कैसे फुला रे आज तू नाहीस येथे ?
वेल दारी सायलीची रोज अजुनी बार देते ।
लाख पुष्पे तोडिल्याविन ये भरोनी पात्र माझे ॥ ३ ॥

बारः मोसम, ऋतू